प्रधानमंत्री कौशल्य विकास (१०० टक्के केंद्र पुरस्कृत - राज्य व्यवस्थापित-PMKVY २.० - CSSM-) या योजनेचा निधी वितरीत करण्याबाबत. (रु.१८.०४ कोटी)

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१,**
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ नोव्हेंबर, २०२०

**संदर्भ :**

१) केंद्र शासनाच्य कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने विशेष प्रकल्प (Special Project) व केंद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) संदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.
२) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक १५/०७/२०१५.
३) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २०/०५/२०१६
४) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २८/०२/२०१७
५) प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-१ महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्रमांक खं.वि./चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/युओआर-८/२०१७-१८/७५०, दिनांक २२/११/२०१७.
६) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२३७/अभियान-१, दिनांक २६/१२/२०१७.
७) उप संचालक, SNP Division/Wing II, कौशल्य विकाव व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक बी-१२०१२/३७/२०१७-एसएनपी, दिनांक २५/०९/२०१७.
८) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक २७/०३/२०१८.
९) संचालक, एमएसडीई/भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक F.No. B-१२०११०/०१/२०१६ -SDE, दिनांक ०१/०४/२०२०

**प्रस्तावना :**

“प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (केंद्र पुरस्कृत राज्य व्यवस्थापित-PMKVY २.० - CSSM) या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेचा दुसरा टप्पा सन २०१६-१८ ते २०१९-२० या कालावधीकरीता निश्चित करण्यात आला होता. सन २०२० मध्ये सदर योजनेचा कालावधी संपुष्टात आला होता तथापि, केंद्र शासनाने सदंर्भाधीन क्र. ९ येथील पत्रान्वये ही योजना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात पुढे चालू ठेवण्यास व राबविण्यास मान्यता दिली आहे.

२. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ ते २०१९-२० करीता एकूण १ कोटी युवकांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. केंद्र शासनामार्फत सदर योजनेमध्ये राज्य शासनाचा सहभाग वाढविण्याच्यादृष्टीने सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यांच्या विशेष प्रकल्प व केंद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांची राज्य शासनामार्फत अंमलबजावणी करावयाची आहे.

३. या योजनेंतर्गत राज्याचे विशेष प्रकल्प या उपक्रमाखाली समाजातील असुरक्षित, वंचित आणि दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात सामावून घेऊन देशाच्या अर्थव्यवस्थेत भर घालण्याच्या दृष्टीने अल्पमुदतीचे कौशल्ययुक्त प्रशिक्षण देण्यासाठी नाविन्यपूर्ण, सृजनशील आणि व्यावहारिक प्रकल्प तयार करण्यासाठीचे निकष केंद्र शासनामार्फत निश्चित करण्यात आले आहेत.

४. केंद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांतर्गत नवीन प्रशिक्षणाकरिता (Fresh training) ४,८९,१५२ उमेदवार एवढे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. नवीन प्रशिक्षणा करिता (Fresh training) निर्धारित केलेल्या ४,८९,१५२ लक्ष्यापैकी २५% अर्थात १,६७,१२७ इतक्या उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण देण्याबाबतचे लक्ष्य महाराष्ट्रासाठी निर्धारित करण्यात आले आहे.

५. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये सदर उपक्रमांतर्गत १) सेक्टर स्किल कौन्सिल (SSC) ने निर्देशित जॉब रोलपैकी केंद्रीय स्तरावर राबविण्यात येणारे जॉब रोल संदर्भातील अभ्यासक्रम, २) SSC ने निर्देशित १२२२ जॉब रोल व्यतिरिक्त राज्य स्तरावरील विशिष्ट मागणीच्या जॉब रोल संदर्भातील अभ्यासक्रम, ३) पारंपारिक व्यवसायाशी संबंधित जॉब रोल व अभ्यासक्रम, ४) सेक्टर स्किल कौन्सिल(SSC) ने निर्देशित जॉब रोलपैकी केंद्रीय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या २२१ जॉब रोल संदर्भातील अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे.

६. प्रधानमंत्री कौशल्य विकास (केंद्र पुरस्कृत राज्य व्यवस्थापित-PMKVY २.० - CSSM) या योजनेंतर्गत सन २०१७-१८ करीता रुपये ८५,७७,६२,६१५/- इतका निधी केंद्र शासनाने राज्य शासनास वितरीत केला असून त्यापैकी रुपये १८,०१,३०,१४९/- (रुपये अठरा कोटी एक लाख, तीस हजार, एकशे एकोणपन्नास फक्त) इतका निधी दिनांक २७/०३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना वितरीत करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेस अनुसरुन रु. ६७,७६,३२,४६६/- इतक्या निधीमधून रु. १८.०४ कोटी इतका निधी आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना अर्थसकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब नस्तीवर विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

"प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००%केंद्र पुरस्कृत योजना)" या कार्यक्रमांतर्गत राज्यांच्या विशेष प्रकल्पांसाठी (Special Project) व केद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांच्या अंमलबजावणीकरिता केंद्राकडून Public Financial Management System(PFMS) या प्रणालीमार्फत, सन २०१७-१८ करीता रुपये ८५,७७,६२,६१५/- इतका निधी राज्य शासनास प्राप्त झाला असून, सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला आहे. कौशल्य विकास उद्योजकता मंत्रालयाने सन २०२०-२१ मध्ये सदर योजना

केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाची मान्यता घेवून सं.क्र. ९ येथील पत्रान्वये चालू ठेवण्यास मान्यता दिली आहे. सदरच्या निधीस अनुरूप राज्याच्या अर्थसंकल्पात सन २०२०-२१ करीता प्रतिबिंबित तरतूद करण्यात आली आहे.

२. केंद्र शासनाने या योजनेंतर्गत सन २०१७-१८ करीता रुपये ८५,७७,६२,६१५/- इतका निधी राज्य शासनास वितरीत केला आहे. त्यापैकी रुपये १८,०१,३०,१४९/- (रुपये अठरा कोटी, एक लाख, तीस हजार, एकशे एकोणपन्नास फक्त) इतका निधी दिनांक २७/०३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना वितरीत करण्यात आला असून, याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र त्यांनी शासनास सादर केले आहे. रुपये ८५,७७,६२,६१५/- इतक्या निधीपैकी रुपये १८,०१,३०,१४९/- इतका निधी वजा जाता शिल्लक रु. ६७,७६,३२,४६६/- इतक्या निधीमधून, रु. १८.०४ कोटी इतका निधी वित्त विभागाच्या मान्यतेने आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना खालील अटींच्या अधीन राहून अर्थसकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत योजनेंकरिता उपलब्ध होणारा निधी मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजना, ०२ सेवायोजना सेवा,००१ संचालन व प्रशासन, (०१) सेवायोजन संचालनालय, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (१) (१२) प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००%केंद्र पुरस्कृत योजना) २२३०A३०७ या लेखाशीर्षाखालील उपलब्ध अनुदानातून खर्च करावा तसेच वितरीत करण्यात आलेला रु.१८.०४ कोटी इतका निधी केंद्र शासनाच्या दि.२५.०९.२०१७ रोजीच्या पत्रामधील मार्गदर्शक सुचनेनुसार "कार्यान्वयिन यंत्रणेने" खर्च करावा.

२. राज्य शासनाने या योजनेसाठी वितरीत केलेला निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी कोषागारामधून आहरीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, महराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. याकरीता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. राज्यात कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी घोषित करण्यात आलेली नोडल एजन्सी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था या योजनेमधील अंर्तभूत प्रकल्पांसाठी कार्यान्वयन यंत्रणा राहील.

४. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार अथवा त्यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार तसेच विहित केलेल्या कालावधीमध्ये या योजनेंतर्गत उपक्रमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. उपक्रमांच्या अंमलबजावणीकरिता कोणत्याही नव्याने पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येवू नये, उपलब्ध पायाभूत/प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करून प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात याव्यात.

५. देश पातळीवर कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने संदर्भाधिन अधिसूचनेद्वारे सामायिक मार्गदर्शन सूचना निर्गमित केलेल्या आहेत. कार्यान्वयन यंत्रणेने सामायिक मार्गदर्शन सुचानांमधील तरतुदींनुसार अथवा त्यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या तरतुदीनुसार तसेच ज्या उपक्रम/प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे त्याच उपक्रम/ प्रकल्पासाठी खर्च करणे बंधनकारक राहील

तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास विहित कालमर्यादेत पाठविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची राहील.

६. याबाबतचे लेखे स्वतंत्र ठेवून खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तपशील केंद्र शासनाच्या संबधीत मंत्रालयाकडे तसेच शासनाकडे पाठविण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी घ्यावी. तसेच सदर लेखे महालेखापाल यांना लेखा तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

७. सदर निधी खर्च करताना वित्तीय अधिकार नियमांचे तसेच वित्त व नियोजन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/नियम/अटी/शर्ती यांचे पालन करण्यात यावे.

३. प्रस्तुत शासन निर्णय नियोजन विभाग यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९०/१४७१, दि. २१/०९/२०२० व वित्त विभाग यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २४०९/व्यय-६ दिनांक ०५/११/२०२० अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२०१११३१५५४२१२२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Skill Development and Entrepreneurship Department, Government Of Maharashtra, ou=eOffice, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2020.11.13 15:57:27 +05'30'

**( संतोष रोकडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१०. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
११. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
१२. महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर.
१३. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय मुंबई.
१४. निवड नस्ती (अभियान-१).